# महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय विभागाकडून राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती आणि शिक्षणफीच्या विविध योजना

आपण ११ वी मध्ये प्रवेश घेतल्यानंतर ऑनलाईन अर्ज भरून आपणांस इ. १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत दरवर्षी रू. ३०००/-एवढी गुणवत्ता शिष्यवृत्ती दिली जाईल. तसेच अनुसूचित जातीच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू.२.०० लाखांच्या आत असेल तर, त्यांच्या पाल्यांनी ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे तेथील संपूर्ण शिक्षण फी, परीक्षा फी व इतर आवश्यक फी तसेच अभ्यासक्रमाच्या प्रकारानुसार दरमहा रू. २३०/- पासून रू. ३८०/- पर्यंत निर्वाहभत्ता दिला जाईल. ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू.२.०० लाखांपेक्षा जास्त आहे त्यांच्या मुलांना संपूर्ण शिक्षण फी, परीक्षा फी व इतर आवश्यक फी ची प्रतिपूर्ती शासनातर्फे संबंधित महाविद्यालयास दिली जाईल.

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. १.०० लाखाच्या आत असेल तर त्यांच्या पाल्यांनी ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे, तेथील संपूर्ण शिक्षण फी, परीक्षा फी तसेच अभ्यासक्रमानुसार दरमहा रू. ९०/- ते रू. १५०/- पर्यंत निर्वाहभत्ता दिला जाईल. ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. १.०० लाखांपासून ते रू. ४.५० लाखाच्या आत असेल त्यांच्या पाल्यांना संपूर्ण शिक्षण फी, परीक्षा फी व इतर आवश्यक फीची प्रतिपूर्ती शासनातर्फे संबंधित महाविद्यालयास दिली जाईल.

राज्यात मागासवर्गीय मुलामुलींसाठी ३८८ शासकीय वसतिगृहे असून येथे प्रवेश घेतल्यास मोफत निवास, भोजन, पाठ्यपुस्तके, स्टेशनरी आणि गणवेश याबरोबरच दरमहा रू. ५००/- ते रू.८००/- एवढा निर्वाहभत्ता दिला जातो.

इ.१२ वी नंतर आपण जर व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतला आणि त्याच महाविद्यालयाच्या वसतिगृहात रहात असाल तर आपणांस रू. ५००० ते रू. १०,०००/- पर्यंत वार्षिक निर्वाहभत्ता मिळेल. जरी आपणांस कोणत्याही वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही तरी सुद्धा अशा प्रकारची सवलत मिळू शकेल.

वरील विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आपणांस ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

एवढेच नव्हे तर राष्ट्रीय सी.ई.टी. मध्ये चांगले गुण मिळवून IIT, NIT इ. देशपातळीवरील संस्थांमध्ये आपली निवड झाल्यास आपणांस राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती मिळेल. यामध्ये शिक्षण फी, वसतिगृहाचे शुल्क, भोजनाचे शुल्क यासाठी येणारा संपूर्ण खर्च तसेच क्रमिक पुस्तके, शैक्षणिक साहित्य इ. खर्चासाठी प्रतिवर्षी रू. १०,०००/- दिले जातात.

पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर आपणांस परदेशात पदव्युत्तर पदवी किंवा पी.एचडी. साठी प्रवेश घेण्याची इच्छा असेल तर आपण परदेश शिष्यवृत्तीचा लाभ घेवू शकता. त्यामध्ये आपणांस परदेशातील विद्यापीठाने प्रमाणित केलेली संपूर्ण शिक्षण फी, निर्वाहभत्ता (अमेरीका व इतर राष्ट्रासाठी वार्षिक १४००० यु.एस.डॉलर व यु.के.साठी ९००० पौंड) पुस्तके, अभ्यासदौरा इ. आकस्मिक खर्च तसेच प्रवेश घेण्यासाठी व अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर भारतात परत येण्यासाठी विमानाचा प्रवास खर्च इ. मदत शासनाकडून केली जाते.

या सर्व योजनांची माहिती आमच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवळी प्रसिद्ध करण्यात येते. तरीही आपणांस अधिक माहितीची गरज भासल्यास आपण जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेशी संपर्क साधून अधिक माहिती मिळवू शकता.